# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१

फोन नं. ०२०/२६१२२२११९ Web.www.dhepune.gov.in E-mail : director.dhepune@nic.in


# जाहिरात

**पदाचे नाव :** प्रकल्प व्यवस्थापक (ग्रीन स्कील आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० च्या अनुषंगाने उच्च शिक्षणमधील सुधारणा)

**अर्ज करण्याचा कालावधी : दिनांक २६ ऑगस्ट २०२३ ते ०६ सप्टेंबर, २०२३**

**अर्जाची पद्धती : ई-मेलद्वारे – stat.dhepune@nic.in**

**आवश्यक अर्हता/पात्रता :**

१. राष्ट्रीय ख्यातीच्या संस्थेची किमान शिक्षण/ अर्थशास्त्र/ समाजकार्य/ सार्वजनिक धोरण यामध्ये पदव्युत्तर पदवी.
२. किमान ५ वर्ष अनुभव, त्यापैकी किमान ३ वर्षाचा शैक्षणिक धोरण, कौशल्य विकास व युवा संगठनासंदर्भातील अनुभव असणे आवश्यक आहे.
३. इंग्रजी व मराठी भाषेचे ज्ञान (लेखी व संभाषण) असणे आवश्यक.
४. संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक - MS Office, सोशल मीडिया डिझाईन टूल्ससह आय.टी. क्षेत्रातील प्राविण्यासह.
५. डेटा विश्लेषण आणि डेटा व्हिज्युअलायझेशनमध्ये प्रात्यक्षिक कौशल्य असणे आवश्यक.
६. सामुदायिक उद्दिष्टासाठी संघभावनेने काम करण्याची क्षमता असणे आवश्यक.
७. राष्ट्रीय व राज्य पातळीवरील शासकीय कामकाजाची माहिती असणे आवश्यक (महाराष्ट्र शासनांतर्गत राज्य किंवा जिल्हा पातळीवर काम केलेल्या व्यक्तीस प्राधान्य राहील.)

**कामाचे स्वरूप :**

१. यूथ एंगेजमेंट आणि वॉटर स्टीवर्डशिप पार्टनरशिपच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, उच्च शिक्षण संचालनालय (DHE), तंत्रशिक्षण संचालनालय (DTE), ग्रंथालय संचालनालय (DoL), कला शिक्षण संचालनालय (DAE), राष्ट्रीय सेवा योजना (NSS), UNICEF यांच्याशी समन्वय साधणे.
२. राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० तील शिफारशीप्रमाणे हरीत कौशल्य, कौशल्य आधारीत शिक्षण, हवामान बदलासंदर्भातील शिक्षण उच्च शिक्षण संस्थामध्ये राबविण्याच्या अनुषंगाने विविध स्त्रोतांकडून माहिती संकलित आणि विश्लेषित करणे.
३. युनिसेफ आणि महाराष्ट्र शासन यांच्या भागीदारीअंतर्गत विकसित केलेल्या हवामान बदल आणि पर्यावरणीय शाश्वततेवरील क्रेडिट अभ्यासक्रम विकसीत करण्यासाठी विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांना पथदर्शक नवकल्पनाच्या बाबत सहाय्य करणे.
४. जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर तसेच विविध राज्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान धोरणांचे विश्लेषण करणे, पुढील सुधारणांसाठी धोरणांचा मसुदा तयार करणे.
५. उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि IIT Bombay यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या उन्नत महाराष्ट्र अभियान (UMA) मध्ये काम करणे, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग तसेच पर्यावरण व हवामान बदल विभाग यांच्यासह जलजीवन मिशन, जल युक्त शिवार २.०, माझी वसुंधरा, हवामान बदलांच्या राज्य कृती आराखडा यांसारख्या प्रमुख कार्यक्रमांमध्ये तरुणांचा समावेश असलेल्या हवामान आणि पाण्याच्या प्रकरणांचा अभ्यास (Case Study) एकत्रित करून महाविद्यालयीन तसेच तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांसाठी कौशल्य, जीवन कौशल्ये आणि CSO, संस्था आणि व्यावसायिकांसोबतच्या अनुभवात्मक शिक्षणासंबंधी इंटर्नशिप योजनांचा कृती आराखडा तयार करणे.
६. कार्यालयीन कामाकरिता प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या कार्यालयाच्या निर्देशानुसार महिन्यामध्ये ४ ते ५ वेळा महाराष्ट्राबाहेर कार्यक्षेत्रांना भेटी देणे.
७. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या कार्यालयाच्या निर्देशानुसार वेगवेगळ्या राज्य, जिल्हा स्तरावर उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रतिनिधित्व करणे.
८. प्रारंभिक करार हा एक वर्ष कालावधीसाठी राहील. कामकाज आणि वित्तलब्धी विचारात घेऊन करार अधिकच्या दोन वर्ष कालावधीपर्यंत विस्तारीत करण्यात येईल. उमेदवाराकडे स्वतःचा लॅपटॉप/टॅबलेट असणे आवश्यक आहे.
९. सद्यस्थितीत प्रचलित दरानुसार मध्यम स्वरूपाच्या कौशल्याधिष्ठीत तज्ञांना देय असलेल्या दराप्रमाणे एकत्रित रु. ६०,०००/- ते ८०,०००/- प्रतिमाह ठोक मानधन देण्यात येईल.

**अर्जाची कार्यपद्धती :**

१. उमेदवाराने संचालनालयाच्या संकेतस्थळावरून विहीत नमुन्यातील अर्ज डाऊनलोड करून संपूर्ण भरलेला अर्ज सविस्तर माहितीसह आवश्यक कागदपत्रे सोबत जोडून मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना dhepune@nic.in या इमेलवर पाठविणे आवश्यक राहील.
२. इमेलच्या विषयामध्ये ''Application for the post of Project Manager'' असे नमूद करावे.
३. अर्ज हा इमेलद्वारे दिनांक **०६ सप्टेंबर, २०२३** पर्यंत पाठवावा.

[Dgipr No. 2023-24/क्र.5/C-3115]